# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१८/ प्र.क्र.६०/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६ नोव्हेंबर, २०१८

प्रति,
आयुक्त,
धुळे व अहमदनगर महानगरपालिका.

विषय :- धुळे व अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१८
मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याकरिता सुधारित कार्यक्रम.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथील वकील श्री. शेळके यांचे दि. २६/११/२०१८ चे पत्र.
२) आयुक्त, धुळे महानगरपालिका यांचे दि. २६/११/२०१८ चे पत्र.

महोदय,

धुळे व अहमदनगर महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये नामनिर्देशनपत्र नाकारल्याच्या विरोधात मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे विविध याचिका दाखल झाल्या होत्या. सदर याचिकांपैकी काही याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचे आदेश दिल्याचे संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे सदर उमेदवार निवडणूक लढविणार असलेल्या खालील प्रभागांच्या निवडणुकीकरिता सुधारित कार्यक्रम देणे आवश्यक आहे.

| महानगरपालिकेचे नाव | प्रभाग क्रमांक |
|---|---|
| अहमदनगर | ८, ९, ११ व १२ |
| धुळे | १२ |

उपरोक्त प्रभागांच्या निवडणुकीच्या खालील टप्प्यांकरिता सुधारित कार्यक्रम देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु / पूर्ण करण्याची तारीख | |
|---|---|---|---|
| | | मूळ कार्यक्रमानुसार | सुधारित कार्यक्रमानुसार |
| ५ | वैधरित्या निर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच | २७/११/२०१८ (मंगळवार) |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | २६/११/२०१८ | २८/११/२०१८ (बुधवार) |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | २७/११/२०१८ | २९/११/२०१८ (गुरुवार) (सकाळी १० वाजल्यापासून) |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २७/११/२०१८ | २९/११/२०१८ (गुरुवार) |

पुढील टप्प्यांचा कार्यक्रम समक्रमांकाच्या दि. १ नोव्हेंबर, २०१८ च्या पत्रान्वये दिल्यानुसार राहील. ( इतर प्रभागांच्या निवडणूक कार्यक्रमात कोणताही बदल नाही. )

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( अ. गो. जाधव )
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र